

# असा आहे मुंबई-बेंगलोर इंडस्ट्रियल कॉरिडॉर...

- तीन लाख कोटी रुपये गुंतवणूकीचा महाप्रकल्प
- एक हजार किलोमीटर कॉरिडॉरचे अंतर
- २५ लाख रोजगाराच्या संधी

**- राजेंद्र मकोटे**
rajamakote34@yahoo.co.in

देशाची आर्थिक राजधानी मुंबई सह पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर कर्नाटकाच्या उद्योग व्यवसायाला प्रचंड गमिमानता देत व्यापक आयामासह थेट विदेशी बाजारपेठ आणि देवाण – घेवाण निर्माण करणारा महाउद्योग प्रकल्प अर्थात 'मुंबई – बगलोर इंडस्ट्रीयल कॉरिडॉर' लवकरच अस्तित्वात येणार आहे. एकूण तीन लाख कोटी रुपये गुंतवणूकीचा आणि प्रत्यक्ष अप्रत्यक्ष २५ लाख रोजगार निर्मिती करणार हा प्रकल्प असून त्यामुळे देशाची आर्थिक राजधानी मुंबईशी ही थेट तालुका पातळीवरील उद्योजक जोडले जाणार आहेत.

मुंबई–बंगलोर इंडस्ट्रीयल कॉरिडॉरचे अंतर एक हजार किलोमीटरचे अंतर आहे. यात ऊर्जा, गॅस पाईपलाईन सुविधा, गॅसवर आधारित उद्योग, माहिती व तंत्रज्ञान, कृषी क्षेत्रातील गुंतवणूक केंद्र शासनाला अपेक्षित आहे. शिवाय स्टील, ऑटो कॉम्पोनंट, रेडिमेड गारमेंटस, फूड प्रोसेसिंग, इंडस्ट्रीजला 'बूस्ट' मिळणार आहे. कॉरिडॉरअंतर्गत सातारा व कोल्हापूर हे बंगलोरमधील प्रमुख उद्योगांसाठी आणि लॉजिस्टिक हब असलेल्या पुणे व मुंबईशी जोडले आहेत. गुंतवणूकदारांसाठी मुंबई–औरंगाबाद–नागपूर आणि मुंबई–कोकण व पुणे–सुपा–कोल्हापूर कॉरिडॉर शासन विकसित करणार आहे.

या कॉरिडॉरबाबत कोल्हापूरने पुढाकार घेतल्यास त्याचा फायदा येथील उद्योगवाढीस व अन्य विकासासाठी होणार आहे. त्याच्या पूर्ततेसाठी सर्व स्थानिक आयटी पार्कसाठी सध्या असलेले आरक्षण

बदलून दिले जाईल. 'स्मार्ट सिटी' म्हणून कोल्हापूरचा सहभाग करण्यासाठी प्रयत्न केला जाईल. अन्य सोयी-सुविधांच्या दृष्टीने कॉरिडॉरचे कार्यालय.

या संदर्भात नुकतीच, गृहराज्यमंत्री सतेज पाटील यांनी महानगर पालिका जिल्हा परिषद पदाधिकारी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एन.जे.पवार, ज्येष्ठ उद्योजक संघटक आनंद माने, डॉ.संजय पाटील सह गोशिमा, समॅक, मॅक, कोल्हापूर इंजिनिअर असोसिएशन कोल्हापूर सराफ असोसिएशन आणि कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अॅन्ड इंडस्ट्रीजच्या संलग्न उपसंस्था यांची व्यापक बैठक घेऊन या प्रकल्पासंबंधी सविस्तर माहिती दिली. दिल्लीमध्ये प्रदीर्घ राजकीय आणि प्रशासकीय कार्यपध्दतीचा प्रत्यक्ष अनुभव असणारे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या विशेष प्रयत्नामुळेच ही सुवर्णसंधी निर्माण होत असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले.

***प्रमुख जिल्ह्यांत बैठकांचे आयोजन***

या नियोजित, मुंबई-बंगलोर इंडस्ट्रीयल कॉरिडॉरच्या पूरक वातावरण निर्मितीसाठी कोल्हापूर पाठोपाठ, पहिल्या टप्प्यात यांचा प्रत्यक्ष लाभ होणाऱ्या सांगली, सातारा, पुणे, नवी मुंबई तसेच बेळगांव, हुबळी, बंगलोर येथील उद्योजकांशी सविस्तर बैठका घेण्यात येणार आहेत.

***कोअर ग्रुप स्थापना***

यानंतर प्रत्येक जिल्हा निहाय शुगर, उद्योग, आयटी शुगर इंडस्ट्रीज गोल्ड आणि इतर उद्योगासाठी कोअर ग्रुपची स्थापना करण्यात येणार आहे. त्यानंतर विभाग आणि राज्यनिहाय असे 'कोअर ग्रुप' स्थापन केले जाणार आहेत. या सर्वांच्या परस्परसमन्वयातून हा महाप्रकल्प टप्प्या-टप्प्याने अस्तित्वात येणार आहे.

राजकीय संधी न मिळाल्याचे शल्य, कोणत्याहि नवीन येऊ घातलेल्या अथवा पूर्णत्वास आलेल्या प्रकल्पास विरोध करणे आणि नाहकपणे त्याला लोकभावना आणि अस्मितेचे स्वरूप देऊन, प्रकल्पविरोधी आंदोलन करण्याची एक अनिष्ट प्रथाच पडत आहे. या गोष्टीचे दूरगामी प्रतिकूल परिणाम उद्योगक्षेत्राला भोगावे लागत आहेत, किमानपक्षी हा एक विधायक दिशा देणार महाप्रकल्प तरी त्यास अपवाद ठरावा. पश्चिम महाराष्ट्रासह उभ्या कर्नाटकाची-मुंबईसारख्या महानगरीच्या बरोबरीने उद्योग-आर्थिक-व्यावसायिक प्रगती व्हावी अशीच तमाम जनतेची प्रखर इच्छा आहे.

देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईसह पश्चिम महाराष्ट्राने नेहमीच केंद्र आणि राज्यशासनासाठी प्रभावी नेतृत्वासह सामाजिक, आर्थिक, बँकींग, पर्यटन क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. यासह प्रतिवर्षी कोट्यावधी रूपयांचा कर (टॅक्स) नेहमी दिला आहे. केंद्रिय नेतृत्वाने याची उशीरा असली तरीही नेमकी दखल घेत भरीव आर्थिक उद्योग उभारणीचे पॅकेज 'मुंबई-बंगलोर' इंडस्ट्रीयल कॉरिडॉरव्दारे दिले आहे.



## मान्यवर म्हणतात...

" कराड-बंगलोर ही रेल्वेलाईन राष्ट्रीय महामार्गाला समांतर करण्यात यावी. उद्योग विस्तारासाठी कोल्हापूर नेक्स्ट डेस्टिनेशन असल्याने कॉरिडॉरचा निश्चित उपयोग होईल.

सुरेंद्र जैन
'स्मॅक'चे अध्यक्ष

---

" 'डीएमआयसी' चे जसे दिल्लीत कार्यालय आहे, त्याप्रमाणे -एमबीआयसी'ची मुंबईत कार्यालय व्हावे.

राजीव परीख
'क्रीडाई' चे अध्यक्ष

---

" कॉरिडॉरबाबतच्या प्रस्ताव तयारीत तंत्रशिक्षणाशी संबधित असणाऱ्या शैक्षणिक संस्थांचे सहकार्य घ्यावे.

चंद्रकांत जाधव
'गोशिमा' चे अध्यक्ष

---

" कराड-धारवाड रेल्वे मार्गाचे बजेट मंजूर झाले आहे. इस्लामपूर, हातकणंगले येथून रेल्वे महामार्गापासून दूर जाऊन परत कागलमध्ये जवळ येणार आहे. ती कोल्हापूरातून जाण्यासाठी प्रयत्न व्हावेत.

'महाराष्ट्र चेंबर, कोल्हापुर' चे संचालक
राजाराम पाटील

---

" बाहेरील आयटी कंपन्या येण्यासाठी आमच्या मागणीप्रमाणे लोकल आयटी पार्कला महापालिकेकडून जागा मिळावी.

'आयटी असोसिएशन'चे अध्यक्ष
विनय गुप्ते

---

" या कॉरिडॉरअंतर्गत पॉवर जनरेशन प्लँटची निर्मिती व्हावी, शिवाय कॉरिडॉरबाबत माहिती देणारे संकेतस्थळ तयार करावे.

'केईए' चे सचिव
प्रदीप व्हरांबळ

---

" प्रस्तावाच्या तयारीसाठी कोअर,सब कोअर आणि हार्ड कोअर असे ग्रुप तयार करावेत. या कॉरिडॉरबाबत कोल्हापूरने पूढाकार घ्यावा.

'क्रीडाई' चे
राम पुरोहित

***